प्रकरण चौथे

विविधज्ञान विस्तारातील

* साहित्य सौंदर्य *

मानवी भावनांची देवाण घेवाण करण्याचे महत्वाचे माध्यम म्हणजे साहित्य होय. मानवी मनातील भावनांचा आविष्कार साहित्यातून होतो. एकोणिसाव्या शतकाचा अभ्यास करतांना तत्कालिनसाहित्यात नवीन दालन उघडलेली आपणास दिसतात. पूर्वी प्रमाणे आध्यात्मिक तत्वज्ञान, पांडित्यपूर्ण लिखाण, शृंगारिक भाव अशा प्रकारच्या लिखाणाचे स्वरूप मानवाधिष्ठीत भावनांचे प्रगटीकरण करण्यात होऊ लागले. माणसाच्या मनात जागी झालेलीसहृदयता तत्कालिन साहित्यात आपले वेगळे वैशिष्ठ्य प्रस्थापित करू लागली. ऐहिक जीवनाशी संबंधीत असलेल्या सुखदुःखाची, भाव-भावनांची क्रिया-प्रतिक्रियांची आचार-विचारांची, भावनोत्कटता साहित्याचा विषय बनली होती. समाजातील भाबडी भावूकता, अंधश्रध्दा, अज्ञान, सामाजिक असमानता, धर्माच्या आड लपून केले जाणारे अत्याचार, हया सामाजिक समस्यांचे चित्रण साहित्यातून होऊ लागले. पाश्चात्यांकडून आलेली सामाजिक क्षेत्रातील समानता, धार्मिक क्षेत्रातील मानवता, राजकीय क्षेत्रातील लोकशाही ही नवी तत्वे आपल्या मनात रूजू लागली आणि त्यामुळे आपल्या संस्कृतितील सामाजिक विषमता, धार्मिक कर्मकांण्ड, राजकीय क्षेत्रातील दंडूकशाही, अराजकता आपल्याला असह्य झाली. आणि नवीन मूल्याने आपण प्रभावीत झाल्यामुळे मानवी मनाचे कंगोरे साहित्यातून उलगडू लागले. "कारण साहित्यात मानवी मनातील मूलभूत भावनांचा अविष्कार होतो. तेंव्हा अशा भावनांनी प्रेरित झालेल्या कृतिउक्तींचाच अविष्कार होत असतो. आणि कृतिउक्तिजन्य अथवा कृतिउक्तीनिष्ठ घटनांचे चित्रण होत असते. व्यक्ती जीवनाचे दर्शन आणि व्यक्तीच्या भावजीवनाचे दर्शन साहित्यात घडते."[१] म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील साहित्यात प्रामुख्याने, समाजसुधारणेच्या

विचार प्रवाहाचे, सामाजिक समस्यांचे सुधारणेला विरोध करणा-या सनातनी-यांचे विचार येऊ लागले. त्यामुळे साहित्य आणि मानवी जीवनाची सांगड घातली जाऊ लागली.

समाज प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी निर्माण झालेले साहित्य माण-साच्या मूलभूत भावनेशी निगडीतच असते. "सामाजिक घडामोडीच्या प्रेरणांच्या संदर्भातच तिचा अन्वय लावण्याचा तिचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो."[२] सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले साहित्य नव्या जीवनाचा आशय घेऊन समाज मनाची आंदोलने आपल्या प्रतिभासंपन्न कृतीतून व्यक्त करीत होता. "मानवीय बुध्दीचा आणि संवेद-नशीलतेचा नितांत रमणीय विलास म्हणजे साहित्य."[३] हेच वाङ्मयाचे स्वरूप एकोणिसाव्या शतकात आत्मनिष्ठ साहित्यातून बघावयास मिळते. नव्या विषयातून प्रगट झालेला भाव शब्दरूप अविष्कारातून एक नवे सौंदर्य घेऊन मानवी भावनांना आवाहन करीत होता. कथा, नाटक, कादंबरी काव्य, ललित निबंध अशा वाङ्मयाच्या वेगवेगळ्या रूपातून जीवनातील ऐहिक समानता, साकार होत होती. जीवनानुभवाला प्राधान्य मिळाल्यामुळे बहुजन समाजाला त्या कलाकृती विषयी आत्मीयता वाटत होती.

कुठल्याही वाङ्मयीन कलाकृतीचा अभ्यास करतांना त्यातील साहित्यसौंदर्य बघतांना त्याचे स्वरूप, आशय, आणि भाषाशैली या तीन टप्प्यातून केला जातो. आत्तापर्यंत अभ्यासलेल्या विविधज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखांचा विचार करतांना या तीन टप्प्यातून त्यातील वाङ्मय सौंदर्य आपणास बघावयाचे आहे.

विविधज्ञान विस्तारातील साहित्याचे स्वरूप:-

वरील विवेचनानुसार या स्त्रीविषयक लेखांचे स्वरूप पाहता स्त्रि-यांच्या सर्वक्षेत्रातील समानतेच्या दृष्टीकोनातून विचार मांडणारा लेखक आपले मत प्रबोधनाला प्रेरक ठरणा-या भाषेतून मांडत होता. त्यातील प्रतिपाद्य विचाराला नव्या दृष्टीकोनाची बैठक होती. म्हणून अतिशय समर्थपणे

स्त्रियांच्या समानतेच्या अधिकाराचे मत आशयघन स्वरूपात मांडले गेले. त्या विचारांची भूमिका प्रचारकी वाटत असली तरी वास्तवाला मिळती जुळती अशी भावनोत्कटताही त्यात यथार्थपणे रेखाटली गेली आहे. "स्त्रीजीवनावर प्रकाश टाकणारे गो. म. चिपळूणकरांचे तीन लेख, स्त्रियांचा अधिकार कोणता, तिचे कौटुंबिक, सामाजिक स्थान काय, कर्तव्य काय हे ठाम पणे वि.प. पंडीतांनी आपल्या व्याख्यानात मांडले. डॉ. पां. दा. गुणे, वा. ना. देव यांनी स्त्रिशिक्षणाचे ध्येय आणि खरी दिशा, स्त्रीशिक्षणासाठी चालू असलेले प्रयत्न आदि स्त्री शिक्षणाचे धोरण लेखातून काळाच्या बदलत्या परिस्थितीला स्त्रीचे सहकार्य सर्व क्षेत्रात कसे अभिप्रेत आहे हे ठामपणे मांडले पण पाश्चात्यांच्या तत्वांचे, संस्कृतिचे अंधानुकरण करून स्त्रीचे व्यक्तिस्वातंत्र्य ही कल्पना वास्तवात उतरू देऊ नये. तर आपली कौटुंबिक, सामाजिक, नैतिक परंपरा अबाधित ठेवूनच हया कल्पनेला साकार करावे. हे कटाक्षाने या सुधारणेचा अवलंब करतांना विचारात घेतले जावे. अशा स्वरूपाच्या मतातून स्त्रियांच्या नव्या जीवनाकडे तटस्थपणे बघून, समर्पक दिशा दाखविणाऱ्या, व्यासंगी, बहुश्रुत लेखकाने स्त्रीजीवनाचे स्वरूप साहित्यात दाखवून दिले.

सुधारणावादाला, स्त्रिच्या व्यक्तीस्वातंत्र्याला कट्टर विरोध करणारा ही लेखक वर्ग विविधज्ञान विस्तारातून आपली मते प्रगट करीत होता. स्त्रिला व्यक्तीस्वातंत्र्य दिले तर, सामाजिक क्षेत्रातील नितीमत्ता सैरभैर होईल. आणि स्त्री शिक्षणामुळे कौटुंबिक संस्कृतिवर आधारलेली आपल्या मौलिक परंपरेचा डोलारा कोसळून पडेल. म्हणून जे आहे तेच योग्य आहे. बालविवाह, पनर्विवाहाला विरोध, या प्रश्नांचा प्रामुख्याने भांडारकर कमळाबाई किबे, अल्योध्दाराचे पुस्तक परीक्षण, मलबारी हिलचे सरकारला सादर केलेले पत्रक हया लेखातून झाला तर विश्वनाथ मंडलीक सारख्या सनातनी विचाराच्या कट्टर पुरस्कर्तीनी ही मत खोडून काढली. खरे प्रेम, पत्नी, सुबोध संवाद, बालविवाहाचा अनुभव, सासुरवास, (समाजचित्र) झाले ते ठीकच झाले. मुलीचे लग्न, अशा लेखामधून स्त्रियांच्यावर विवाहाने आणि वैधव्याने कोसळणाऱ्या दुःखाचे हृदयस्पर्शी, मनाचा ठाव घेणारे, पकड घेणारे वास्तववादी

चित्रण केले आहे. व ही तिची दुर्दशा करण्यास समाज आणि समाजाचे धर्माच्या नावाखाली घालून दिलेल्ले अनिर्बंध नियम कारणीभूत आहेत. व आता हे नियम शिथिल झाले पाहिजेत हा प्रतिपादनाचा प्रमुख हेतू होता. त्याबरोबरच तिच्या-तील शक्ती, सामर्थ्य, आणि तेजाची ओळख समाजाला करून दिली जाऊ लागली होती.

स्त्रियांसाठी पंचरत्नमाला, स्त्रीभूषण, स्त्रीतेज अशा लेखातून रा. भि. गुंजीकरांनी स्त्रीजवळ असलेला मौलिक मर्यादाशीलतेचा, शालीनतेचा गुण कसा जोपासला जावा हे सांगून स्त्री स्वभावातील मूलभूत विचारांना उजाळा देऊन तिचे कर्तव्य क्षेत्र तिला समजावून सांगितले होते. मितभाषी असावे, हसत मुख राहावे, उदासीवृत्तीने, आळशीपणाने राहू नये, कौटूंबिक जबाबदारी म्हणजे मुलांचे संगोपन नीट करावे आणि पतिच्या ठायी असलेले प्रेम आनंदाने व्यक्त करावे. अशा सूचक वाक्यांनी तिच्या कर्तव्य क्षेत्रात अधिक दक्षता आणण्याचे कार्य या साहित्यातून झाले आहे.

डॉ. आनंदीबाई जोशींचे चरित्र, कृपाबाई सत्यनाथन, अहिल्याबाई होळकर, व्हिक्टोरिया राणी आदी तेजस्वी स्त्रियांच्या चरित्रातून त्या व्यक्तीचे अलौकिकत्व आणि कर्तृत्व यांची स्त्रियांना, समाजाला परिचित करून देऊन ते तत्कालिन स्त्रियांना मार्गदर्शक कसे ठरेल या दृष्टीकोनातून लिहिले गेले आहे. वाचकांना स्त्रियांच्या ठायी असलेल्या कर्तबगारीची जाण कशी अलौकिक आहे हे पटवून दिले आहे.

स्त्री लेखीकांच्या साहित्याचे स्वरूप:-

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणा-या वरील स्त्रियांचे चरित्र विस्तारातून प्रकाशित झाले त्या बरोबरच साहित्यिक क्षेत्रात पदार्पण करणा-या सुविद्य लेखिकांचाही परिचय समाजाला झाला. जीवनाच्या कुठल्या-ही कार्यक्षेत्रांत "स्त्री"मागे नाही हे त्यावरून सिध्द झाले. बदलत्या जीवनाचे साद पडसाद, अतिशय शांत आणि चिंतनशील वृत्तीतून या स्त्री लेखिकांनी समाजाच्या निदर्शनास आणून दिले आहे. विचारांची खोली, कुठेही भावनांचा

उद्रेक न होऊ देता, जबाबदार भूमिकेतून प्रामुख्याने काशिताई कानिटकरांनी आणि कमलाबाई किर्बेंनी आपला दृष्टीकोन मांडला आहे. पुरुषांच्या मनांत स्त्रियांच्या परवशतेमुळे, असहाय्यतेमुळे, निर्माण झालेली सहानुभूति साहित्यातून प्रकट होतांना, ब-याच ठिकाणी संभ्रमावस्था, दिसून येते. तिला व्यक्ती स्वातंत्र्य द्यावे, पण त्यामुळे आपली कौटूंबिक सामाजिक घडी तर बिघडणार नाही ना? अशी ती अवस्था होती. पण काशीताई कानिटकर आणि कमला-बाई किर्बेंच्या लेखात कुठल्याही प्रकारची भावनात्मक घालमेल दिसून येत नाही. सासुरवासाचे समाजचित्रण करतांना, स्वावलंबीत्व आणि शिक्षण, स्त्रीला आवश्यक आहे हे विचार गांभीर्याने, संवादात्मक स्वात मांडले आहेत. त्यात थोडासा नाट्याविष्कार असल्याने तो समाज मनाला सरळ जाऊन भिडणारा भाव अधिक उत्कट वाटतो. त्यांनी लिहिलेले वर्षाऋतूतील क्षिप्रानदीचा काठ, माझे बाळ, "वर्षाऋतूतील क्षिप्रा नदी" आदि निसर्गवर्णनात्मक लेख व पुत्र विरहाने व्याकुळ झालेल्या मातेचे चित्रण, अप्रतिम आहे. निसर्गाच्या सान्नी-ध्यात माझं बाळ गेले असल्याने ही पंचमहाभूत त्याची काळजी घेतील आणि धरणीमातेच्या मांडीवर तो पहूडला असल्याने माझ्या पेक्षा मातृत्वाचा वर्षाव त्याच्यावर अधिक होईल हे वर्णन खरोखरीच आपले वेगळे पण, व मनातील व्याकूळतेचे चित्रण हृदयस्पर्शी करून जाते. काशिताई कानिटकरांनी लिहिलेल्या, कथा, चरित्रे, समीक्षणात्मक लेख यातूनही त्याचे साहित्यातील वैशिष्ठ्य आपला वेगळा ठसा उमटवून जाते. कथा नीति आणि धार्मिक बोध वेगळा ठसा उमट-वून जाते. कथा निवेदनातून येणा-या निसर्ग वर्णनात स्त्रियांच्या स्थितीचे, परवशतेचे, अबलत्वाचे दर्शन ही सहजसुलभ भावनेतून घडून जाते. मानसिक, भावनिक दोन्ही पातळीवर याचा ठसा आपले वेगळेपण ठवसून जातो. विवेच-नात थोडेसे पाल्हाळ आल्या सारखे वाटले तरी रसभंग मात्र कुठे होत नाही. याप्रमाणे स्त्रीच्या समानतेचा विचार, तिच्या परवशतेचा विचार, तिची दुःखे, तिचे अधिकार व कर्तव्य सांगणारे विषय, पुरुषांच्या भावना, विचार आणि चिंतनातून अभिव्यक्त झाले. तसेच स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्याला विरोध कर-णा-या लेखातूनतो संभ्रमावस्थेच्या स्वरूप प्रत्ययकारी दर्शन साहित्यातून दिसून आले. स्त्री लेखीकांनी लिहिलेल्या साहित्यातून स्त्री सुलभ भावनांची मांडणी

असली तरी विचारातील गांभीर्य आणि चिंतनशीलता लक्षणीय आहे. सुधारणेच्या वाटेवरील पाऊले ही स्त्री लेखीकांनी सावधगिरीने आणि जोखून टाकलेली आहे. त्यांचे हे कार्य साहित्यदालनात भर घालणारे असून नुकतेच स्त्री लेखिकेचे साहित्य क्षेत्रात पदार्पण झाल्यामुळे स्त्युत्य आहे. सामाजिक जाणीवांना काशिताई कानिटकर, गिरीजाबाई केळकर कमला बाई चिंबे या लेखिकांनी संयुक्तिक, समर्पक, आशयघनातून अभिव्यक्त केले आहे. तर लक्ष्मी तनया, कुसूम सारख्या नवोदित कवयत्रींनीही स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण यथार्थपणे रेखाटले आहे.

विविधज्ञान विस्तारातील प्रसिध्द झालेल्या ज्या ललित लेखातून पुस्तक परिक्षा, कथा, कविता, निसर्गवर्णनपर लेख, स्त्री चिंतना विषयक नव्या जाणीवा. मांडल्या गेल्या त्याचे स्वरूप असे आशयघन आहे.

विविधज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखाचे आशय सौंदर्य:-

विस्तारातील लेख अभ्यासतांना आशयाच्या दृष्टीने जी अर्थपूर्ण आणि सुंदर वाक्ये अभ्यासली ती अशी.

१) फुलांच्या परिमलाचा सुगंध त्याच्यातील रंगसमाशी निगडीत असतो, त्यांचे वेगवेगळ सौंदर्य एकत्रीत झाल्याने अप्रतिम होण्याचा लाभ त्यांना होतो. तत्वत स्त्रियांच्यातील सद्गुण प्रसंगानुरूप जसा आकार घेतील तसतसे जीवन सुंदर होऊन जाईल. पण फक्त श्रध्दा, निष्ठाप्रितीची निकोप संगिह तिथ असावी.

२) जिथे सौंदर्य व सौकुमार्य अधिक तिथे पवित्रता टिकणे कठीण.

३) मनोज्ञ स्त्रीच्या सहवासाने सुख सर्वात प्रधान असून त्याची योग्यता फार मोठी आहे.

४) अनाथ गाईची दु:खे हलकी करण्याचे पुण्य एका सुधारक वर्गानेच संपादिले आहे.

५) एखाधी चिमणी ससाण्याने मारावी आणि तिचे अस्तव्यस्त पडलेले पंख

दृष्टीत पडावे. तशी अवस्था होऊन आईच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या वाचून राहणार नाहीत.

६) एखाद्या नाजूक रोपाला जसे आकाशातील मृदुदंव, जसा ताजेपणा देणारा पाऊस जसा बाहयत: कडक-दिसणारा वारा, आणि जसे आनंद दायक सूर्य किरण"

७) बुध्दीची एकतानता स्त्रीत नाही व हृदयाचा निव्वळा पुरुषात नाही याचा अर्थ स्त्रिया निर्बुध्द अगर पुरुष पाषाण हृदयी असतात असा मुळीच नाही, पण बुध्दीचे साम्राज्य जसे पुरुषात तसे हृदयाचे साम्राज्य स्त्रीत आहे. हे निर्विवाद आहे.

८) पुंरुष म्हणजे धैर्याचा स्तंभ व स्त्री म्हणजे भीरुपणाची मूर्ती.

९) स्त्री ही मायाळू पणाची व चांगुलपणाची खाणच आहे. केवळ सर्व गुणांची रासच.

१०) स्त्रियांत कित्येक गुण असल्यामुळे पुरुषास त्यांचे साहाय्य असणे फार आवश्यक आहे.

११) स्फटिका प्रमाणे स्वच्छ वाहणाऱ्या झऱ्याला गढूळ पाण्याचा ओढा येऊन मिळाल्यावर त्या एकत्र झालेल्या पाण्याच्या प्रवाहाला तेथून निराळाच रंग येऊन तो पुढे गढूळच वाहू लागतो.

वरील सर्व आशयघन वाक्यातून मानवी जीवनाशी संबंधीत असलेल्या भावनांचा आविष्कार अत्यंत सरस आणि उत्कट झाला आहे. हृदयस्पर्शी संवेदनक्षमता जागी करणारे वाक्य सामाजिक सुधारणेतील स्त्रीच्या जीवनाचे चित्र स्पष्ट करणारे आहे, तिच्या विषयीचा आदर, सहानुभूति, ही वरील वाक्यातून स्पष्ट होत जात. यातील प्रचारकी आणि प्रसारकी आशयातील अभिव्यक्ती सौंदर्य भावनेकडे समर्थपणे झुकणारी आहे.

स्त्री लेखिकेच्या साहित्यातील आशयघनता:-

जनमत जागृती आणि नव्या दृष्टीकोनातून स्त्रीयांकडे बघण्याचा कल स्त्री लेखिकांचा कल होता. पुरुषांनी स्त्रियांची जाणून घेतलेली दु:ख आणि

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मुळांत स्त्रिया सोशित असलेली दु:खे यात कुठे तफावत दिसते का? ते खालील आशय पूर्ण वाक्यावरून ही बघता येईल. समदु:खीत्वाची बोच स्त्री लेखीकांनी साहित्यात मांडण्यात कितपत यशस्वी झाल्या याचे अवलोकन तुलनात्मक दृष्टीने करता येईल. काशीताई कानिटकरांनी स्त्रियांच्या दुर्बलतेचे, परवशतेचे चित्रण कथांमधून केले आहे ते असे.

१) बोरी, पळस व रानकेळी यांच्याकडे पाहिले तर विधा-यांना संसारात सुखकार थोडे असेल असे दिसते कारण ती म्लान व चिंताक्रांत अशी दिसते.

२) ठिकठिकाणी नदीच्या पाण्याचे हे पाट जणू त्यांचा प्रवाह खाली चालला होता. त्यामुळे असे वाटे की एखादी, लहकी माहेरवाशीण सासरी जातांना जशी खिन्नवदन अश्रू पूरित नेत्रानी मातापित्यांचे घर सोडते व जो पर्यंत माहेरची माणसे ते घर निदान गांव दिसत आहे तो पर्यंत मागे वळून पून्हा पुन्हा पाहत असते. त्या प्रमाणे ती जणू पितृगृहाकडे वळून वळून पाहात आहे व खिन्नवदन करून मार्ग क्रमित आहे.

३) बायकांचे अंत:करण बायकांनाच ठाऊक म्हणून द-या सम स्त्रिया नदीला पोटाशी कवटाळून धरीत व कडे सभी निर्दय पुरुष मोठ्या निष्ठूरतेने तिला "हं चल, लवकर, उशीर झाला आता पुरे आता"

अशा प्रकारच्या वाक्यातून साभिनय भावनांचे चित्रण झाले आहे. व स्त्री जीवनाचे चित्रही मार्मिक पणे रेखाटले गेले आहे. कमलाबाई टिळकांनी ही समाजचित्र, या सदरातून सासुरवास, बालविवाहाचा अनुभव यातून स्त्री जीवन चित्रीत केले आहे. वर्षाऋतूतील क्षिप्रा आणि माझे बाळ मधील स्त्रीसुलभ भावना तर फारच अप्रतिम रीतिने मांडल्या आहेत.

१) माता ज्या प्रमाणे आपल्या अपत्यावडे पाहते त्याहून जास्त स्नेहाने सृष्टी सुंदरी वर्षाऋतुची शोभा अवलोकन करण्यात गढून गेली आहे.

२) पण आता तर माझे बाळ दयाळू धरणी मातेने आपल्या विशाल उदरात धारण केले आहे.

अशा वाक्यातून मातृत्वाची उच्च कोटीची करुण भावना हृदय हेलावून सोडते.

आणि त्यातील आशय सौंदर्य, मनातील भावना, विचाराच्या दृष्टीकोनातून पकडू येते.

विविधज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखातील भाषा-शैली:-

साहित्याचे महत्वपूर्ण अंग म्हणजे साहित्याची भाषा भावना आणि विचारांना प्रगट करण्याचे एकमेव माध्यम. साहित्यातील आशय, अविष्काराचे सौंदर्य हे भाषेच्या अभिव्यक्तीवर अवलंबून असते. म्हणूनच भाषा-शैलीचा विचार करणे अगत्याचे ठरते. "ये हृदयीचे ते हृदयी" यातले ही जी प्रक्रिया आहे ती भाषेच्या माध्यमातून साधली जाते..

यातील भाषेचा अभ्यास करतांना त्यात आलेल्या म्हणी, वाक्प्रचार, शब्दांचे सौंदर्य, इतर भाषांचा त्यावर झालेला परिणाम या टप्प्यातून करावयाचा असतो... स्त्रीजीवनाशी संबंधीत स्त्रीसुलभ भावनांचा अविष्कार उपमा, रूपकांच्या माध्यमातून केला गेलेला आहे. स्त्रियांच्या सद्गुणांचा सामर्थ्याचा परिचय करून देताना ओजस्विता, दृढनिश्चय, आर्यतेजाचा सुंदर प्रकाश, स्वाभाविक मर्यादशीलपणा, विनय, नम्रता, स्तुतिविमुखता, भिडस्तपणा, मायाळू, दयाळू, रमणीयत्व, पापभिरू, कोमलांगी, अशा शब्दांमधून तिच्या ठायीचे स्त्रीसुलभ भाव स्पष्ट केले आहेत. देहलतेला समाजरूपी वृक्षापासून तोडून टाकणे, स्त्रीला केवळ गारगोटी समजता, पण त्या तशा नसून फार स्वच्छ व वजनदार हिरे आहेत. प्राणोल्लेख संस्कार करणारा सरस जव्हेरी, त्या हि-याची पारख करण्यास लायक पाहिजे, मुलगी म्हणजे झाडाच्या अंगाची फांदी, लग्न म्हणजे बाल्य हिरावून नेणारा विधी, एखाद्या नाजूक रोपाला जसे आकाशातील मृदू-दव जसा ताजेपणा देणारा पाऊस जसा बाहयता कडक दिसणारा वारा आणि जसे आनंददायक सूर्यकिरण, तव्दत स्त्री पुरूषास किंवा माता बालकास जपत असते. अशा उपमा अलंकारांनी स्त्री जीवनाचे वर्णन केले आहे. विर्त्तीरूपी देहावर भोग-यांच्या फुलांचा हार, अंतस्थ प्रेमज्योतीचे सुखकारक दिव्य तेज झळकू लागते. अशा उपमांतून आदरयुक्त भावपूर्ण श्रध्दांजली डॉ. आनंदीबाई

जोशी यांना लेखकाने वाहिली आहे. आफ्रिकेतील वाळूच्या मैदानात कुठे कुठे Basis नावाचे झरे सापडतात, अशी उपमा आनंदीबाई सारख्या कर्तृत्ववान स्त्रीस देऊन पर्यायाने स्त्री शिक्षणाच्या औदासिन्यतेला दिलेली ही उपमा आहे. पुष्प करंडक परिक्षेत प्रत्येक फुलांशी स्त्रीच्या सद्गुणांची रूपकात्मक तुलना केली आहे.

कर्तुमकर्तुम, पुलकितगात्र, आनंदाश्रुपरिप्लुप्तनेत्र सच्छिष्या, विवेकरज्जू, शाणोल्लेखसंस्कार, दुराग्रहमूलक, बुध्दीची एकतानता, हृदयाचा जिव्हाळा, सच्छीलता, कुटूंबबलसंवर्धक, कुटूंबबलविध्वंसक, अशा संस्कृत प्रचूर शब्दांचा वापर लेखातून दिसून येतो.

काशीताई कानिटकरांनी एकादश स्कंधाच्या भाष्यावर केलेली टीका "एकादशस्कंधासारख्या ज्ञानभांडाराची केवळ मूर्तिच त्यातही अत्यंत आत्मनिष्ठ साधु श्री एकनाथ महाराजांसारख्यांनी त्यावर केलेले भाष्य या सर्वच गोष्टी उच्च, अतिउच्च, व उच्चतम अशापैकी आहे." अशा प्रकारच्या समीक्षणात्मक लेखात शब्दांची संरचना फक्त झाली पण त्यातून काशीताई कानिटकर नेमका आशय व्यक्त करू शकल्या नाहीत.

कांही वेळेस भाषेचा वापर करतांना त्यातील भावनात्मकता, विषयाचे गांभीर्य, अगत्य, औचित्याचे भान राहात नाही. " दुसऱ्याचे अधिकार कमी करण्याच्या वेळेस ते अधिकार ज्या स्वरूपाचे असतील, त्या स्वरूपाप्रमाणे ते कमी करू दक्षिणा-या मनुष्याच्या अंगी विशेष शरीर अथवा मानसिक शक्ती धूर्तता, ढोंग प्रसंगी जरूर लागेल तशी हरएक प्रकारची लबाडी करण्यास सिध्दता व ती करण्याचे चातुर्य कोणत्याही एखाद्या गोष्टीची वास्तविक स्थिती आच्छादून आपल्या उद्देशास अनुकूल वाटेल तशी करून दाखविण्याची शक्ती इत्यादि गुण. हे लांबलचक वाक्य वाचतांना औचित्यभंग झाल्या सारखा वाटतो. व "स्त्रियांचे अधिकार" हा विषय पाहिजे तसा स्पष्ट होत नाही. विषयाचे गांभीर्य राहात नाही.

याउलट रसपरिपूर्ण अशी रचना ही यापैकी कांही लेखात आहे.

बदलत्या काळाबरोबर पडणारी आपली पाऊल त्या विचार प्रवाहाच्या टप्यातच पडली गेली पाहिजे. "बदलत्या काळाबरोबर संकेतही बदलायला हवेत युगानुयुगे जे कथानक जसे वागीत आलो. तसेच ते लिहिले गेले पाहिजे हा अट्टाहास आजी-बाईच्या सोवळ्या ओवळ्या सारखाच अप्रयोजक होय" (अहिल्योध्दार) ही भाषा ओघवती आहे. तसेच साहित्याचे बदलणारे रंगरूप निश्चीत अर्थाने दाखवून देणारी आहे. त्यामुळें यातील पारंपरिकता जाऊन जो नवा विचार प्रस्थापित होतोय त्याचे भावनिक, वैचारिक मर्म ही मनाला भिडते. समर्पक शब्दांची शैली हे व्यामिश्रभाव यथार्थपणे निर्माण करते.

समारोप

वरील सर्व विवेचनावरून भाषा शैलीचा धावता आढावा आपण घेतला. ललित लेखात काही निसर्गवर्णन, तर कांही कथांमधून घडणारे स्त्री जीवनाचे दुर्दभ दर्शन घेतले आहे. तरी कांही ललित निबंधातून आजमावलेले वाङ्मयीन सौंदर्य बघीतले आहे. यातील भाषा शैली भारदस्त, नि:संदिग्ध प्रासादिक, आणि भावनांना यथायोग्य जाऊन भिडणारी आहे. आखीव आणि रेखीव संरचना समाज सुधारणेच्या कलाने सुत्रबध्दपणे आपले इप्सित साध्य करते. एकंदर भाषा-शैली ओघवती, उत्कट, स्पष्ट, भावनांना आव्हान करणारी, हृदयाला भिडणारी आहे. "केसरी व विविधज्ञान विस्तार यांच्या दर्जाचे मराठी समजावे असे गौरवाने पा. दा. गुणे ह्यांनी स्त्री शिक्षणाचे ध्येय व दिशा यात म्हटले आहे. तेव्हाच यातील भाषाशैलीचे वैशिष्ठ्यही स्पष्ट होते. शुध्दता, ओघवती शैली अभिव्यक्तीचे कसब, अविष्कारातील सौंदर्य, अकृत्रिमप्रासादिकता, विचारपरिप्लुप्तता ही वैशिष्ठ्ये भाषेची सांगता येतील. त्यामुळे विविधज्ञान विस्तारातील लेख, आशय, विषय, स्वरूप, भाषाशैलीच्या दृष्टीने श्रेष्ठ दर्जाचे आहे. भावनेला आव्हान करून उचित अभिप्रेत संवेदनशीलता जागृत करण्याची शक्ती या लेखातून स्पष्टपणे दिसून येते. वाङ्मयीन क्षेत्रातही विचारप्रगटीकरण, चिंतन, आणि मननाच्या ओघाने येऊन ललित साहित्याची निर्मितीही यथार्थपणे साकार झाली आहे.

संदर्भ सूची

१) सदा क-हाडे — अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी पान नं॰ १०

२) कित्ता — -॥-

३) डॉ॰ उषा मा॰ देशमुख — सहित्य शोधण पान नं॰ ६